नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २३१ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026



मंगळवार, दि. ०४ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

नेवासा येथे खुला कांदा मार्केट सुरू झाल्यापासून तीन महिन्यात ७ कोटी ५० लाखाची उलाढाल : सभापती नंदकुमार पाटील यांची माहिती



नेवासा (समर्थ गांवकरी)

नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नेवासा येथील आवारात सुरू झालेल्या खुला कांदा मार्केट मध्ये आतापर्यंत तीन महिन्यात ६६५०क्विंटल कांद्याची आवक झाली असून सुमारे ७ कोटी ५० लाख ६५ हजार ३०२ रुपयांची उलाढाल झाली असल्याची माहिती नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील यांनी दिली.

नेवासा आवारामध्ये दि.६ मे २०२६ पासून माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या उत्कृष्ट नियोजनाखाली खुला कांदा मार्केट सुरू करण्यात आले.खुला कांदा मार्केट सुरू झाल्यावर अगोदर दर मंगळवारी व गुरुवारी खुला कांदा मार्केट सुरू करण्यात आले. त्यानंतर कांदा उत्पादक शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेता रविवारी देखील खुला कांदा मार्केट सुरू करण्याचा निर्णय संचालक मंडळाच्या वतीने घेण्यात आला.त्यानंतर रविवारी देखील सुरू झालेल्या खुला कांदा मार्केटला कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला व आजपर्यंत मिळत आहे.

मे ते जुलै पर्यंत अशा तीन महिन्याच्या कालावधीत आतापर्यंत एकूण ३ हजार ९२४ वाहनांची नोंद झाली.मे महिन्यात १९ हजार ३८७ क्विंटल कांद्याची आवक झाली त्यात १ कोटी ४२ लाख २९ हजार ९११ रुपयांची उलाढाल झाली.जून महिन्यात २६ हजार ५५९ क्विंटल कांद्याची आवक झाली यामध्ये३ कोटी २१ लाख ६२ हजार ८९ रुपयांची उलाढाल झाली.जुलै महिन्यात २ कोटी ८६ लाख ७३ हजार ३१२ रुपयांची उलाढाल झाली

तर जुलै महिन्यात १४ हजार ७०४ क्विंटल कांद्याची आवक झाली त्यात २ कोटी ८६ लाख ७३ हजार ३१२ रुपयांची उलाढाल झाली

आतापर्यंत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नेवासा आवारात तीन महिन्यामध्ये ६० हजार ६५० क्विंटल कांद्याची आवक झाली असून त्यामध्ये एकूण ७ कोटी पन्नास लाख ६५ हजार ३०२ रुपयांची उलाढाल झाली. असल्याचे सभापती नंदकुमार पाटील यांनी सांगितले. उच्च प्रतीचा कांदा नेवासा आवारात उपलब्ध होत असल्याने येथून दुबई येथे देखील कांदा निर्यात केला गेला त्यामुळे नेवासा मार्केट कमिटीच्या कांद्याला परदेशातही मागणी होऊ लागली आहे.येथे खुला कांद्याचा लिलाव झाल्यानंतर लगेच रोख पेमेंट केले जाते. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दर त्याच बरोबर सुविधा कशा उपलब्ध होतील यासाठी नेवासा मार्केट कमिटी संचालक मंडळ हे प्रयत्न करत असून माजी मंत्री शंकरराव गडाख यांचे वेळोवेळी होत असलेल्या मार्गदर्शनामुळे नेवासा कांदा मार्केट आता राज्यासह परदेशात प्रसिद्ध होऊ लागले असल्याचे सभापती नंदकुमार पाटील यांनी पत्रकारांशी बोलतांना सांगितले.

नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नेवासा आवारात कांद्याला समाधानकारक भाव मिळत असल्याने आजूबाजूच्या तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकरी ही नेवासा येथील मार्केट कडे आकर्षित झाला आहे,कांदा मार्केट मुळे नेवासा शहराची बाजारपेठ ही फुलू लागली असल्याचे चित्र पहावयास मिळत असल्याने नेवासा कामिका एकादशीला मोठी यात्रा भरत असल्याने नेवासा मार्केट कमिटीमधील रविवारचा होणारा खुला कांदा लिलाव होणार नाही मार्केट यादिवशी बंद रहाणार असल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी या दिवशी कांदा मार्केट ला आणू नये असे आवाहन सभापती नंदकुमार पाटील यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना केले आहे

सुपा येथे 'दहा कोटी नशा मुक्ती प्रतिज्ञा महाअभियान' उत्साहात संपन्न

पारनेर (समर्थ गांवकरी)

सध्याच्या धावपळीच्या युगात वाढत्या व्यसनाधीनतेमुळे तरुण पिढी आणि समाज चिंतेच्या गर्तेत सापडला आहे. या गंभीर समस्येवर मात करण्यासाठी आणि समाजात जनजागृती निर्माण करण्यासाठी सुपा येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या केंद्रातर्फे दहा कोटी नशा मुक्ती प्रतिज्ञा महाअभियानांतर्गत' विशेष व्यसनमुक्ती प्रतिज्ञा व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

ब्रह्माकुमारी साधना दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाला परिसरातील नागरिक आणि अध्यात्मिक साधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रेरणादायी कार्यक्रमास देवराम भाई, दिलीप भाई, लक्ष्मण भाई आणि बाळासाहेब पवार यांच्यासह प्रतिमा माता, सुनीता माता, मीना माता, सुषमा माता आणि पठारे माता आदींसह अनेक प्रमुख साधक उपस्थित होते.

सर्वांनी मिळून व्यसनमुक्त समाज घडविण्याचा संकल्प केला. व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम आणि मूल्याधिष्ठित जीवनशैली

उपस्थित भाई , माता व नागरिकांना मार्गदर्शन करताना ब्रह्माकुमारी साधना दीदी यांनी सांगितले की, आजच्या काळात वाढत्या व्यसनाधीनतेमुळे विद्यार्थी, युवक तसेच संपूर्ण समाजावर अत्यंत गंभीर परिणाम होत आहेत.



विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच व्यसनाधीनतेबाबत जागरूकता निर्माण व्हावी, त्यांनी मूल्याधिष्ठित जीवनशैलीचा स्वीकार करावा आणि एका निरोगी समाजाची निर्मिती व्हावी, याच उद्देशाने शिवदर्शनाच्या माध्यमातून प्रजापिता ब्रह्माकुमारी विश्वविद्यालयातर्फे 'दहा करोड नशा मुक्ती प्रतिज्ञा अभियान' देशभरात राबवले जात आहे.

पारनेर सेंटरच्या संचालिका ब्रह्माकुमारी साधना दिदी यांनी आपल्या मार्गदशनातून आजच्या काळातील सर्वात मोठ्या समस्येवर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या की, आज संपूर्ण भारत वर्तमान काळात प्रचंड ताणतणाव आणि टेन्शनमुळे त्रस्त झाला आहे. या मानसिक तणावातून बाहेर पडण्यासाठी अनेक व्यक्ती चुकीच्या मार्गाने व्यसनांच्या आहारी जातात; परंतु व्यसन केल्यामुळे टेन्शन कधीही कमी होत नाही, तर उलट ते आणखी वाढते.या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी प्रजापिता ब्रह्माकुमारी विद्यालयाने ६ ऑगस्ट ते २० ऑगस्ट दरम्यान 'नशा मुक्त भारत अभियान'यशस्वीपणे राबवले आहे. या अभियानांतर्गत आतापर्यंत ४ कोटी व्यक्तींपर्यंत पोहोचण्यात यश आले असून, त्यापैकी तब्बल ३ कोटी लोकांनी व्यसनांना कायमचा रामराम ठोकून व्यसनमुक्त जीवन स्वीकारले आहे, ही आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानाची व गौरवाची बाब आहे.

येत्या २५ ऑगस्ट रोजी विद्यालयाच्या मुख्य प्रशासिका दादी प्रकाशमनीजी यांच्या स्मृतीनिमित्त त्यांना खरी श्रद्धांजली तेव्हाच ठरेल, जेव्हा आपण सर्वजण मिळून या 'नशा मुक्त भारत अभियानाचे' रूपांतर एका जनआंदोलनात करू. हे अभियान विश्वरूप धारण करेल आणि खऱ्या अर्थाने आपला भारत देश पूर्णपणे 'नशा मुक्त भारत' बनेल, असा दृढ विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना व्यसनमुक्त राहण्याची आणि इतरांनाही प्रेरणा देण्याची प्रतिज्ञा देण्यात आली. कार्यक्रमाची वाच्यता आणि नियोजन अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात पार पडले.

डिंभे धरणाच्या विसर्गामुळे लाखनगावचा पूल पाण्याखाली; वाहतूक बंद

मंचर (समर्थ गांवकरी)

आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम भागात सुरू असलेल्या दमदार पावसामुळे हुतात्मा बाबू गेनू सागर डिंभे धरणातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे घोडनदीच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ झाली असून बेल्हा– जेजुरी रस्त्यावरील लाखनगाव येथील पूल सोमवार दि.३ रोजी दुपारी पाण्याखाली गेला आहे. पुलावरून पाणी वाहू लागल्याने वाहतुकीस धोका निर्माण झाला असून काही वेळात वाहतूक पूर्णपणे बंद होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

धरणातील पाणीसाठा सुमारे ९० टक्क्यांहून अधिक झाल्याने सांडवा, उजवा कालवा, डावा कालवा तसेच घोडनदीपात्रात पाणी सोडले जात आहे. त्यामुळे नदी दुथडी भरून वाहत असून लाखनगाव येथील बेल्हा–जेजुरी मार्गावरील जुन्या पुलावर पाणी आले आहे. धोकादायक परिस्थिती असूनही काही वाहनचालक पुलावरून वाहने नेण्याचा प्रयत्न करत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.प्रशासनाने अशा प्रकारचे धाडस टाळून पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.दरम्यान, या ठिकाणी नवीन पुलाचे काम अनेक महिन्यांपासून सुरू असले तरी ते अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यामुळे दर पावसाळ्यात जुना पूल पाण्याखाली जाऊन वाहतूक विस्कळीत होते. याचा नागरिक, शेतकरी आणि व्यापाऱ्यांना मोठा फटका बसत असून



स्थानिक व्यवसायांवरही परिणाम होत आहे. असे आंबेगाव तालुका शेतमाल प्रक्रिया संस्थेचे अध्यक्ष सतीश रोडे पाटील यांनी सांगितले. लाखनगाव येथील नवीन पुलाचे काम तातडीने पूर्ण करून हा कायमस्वरूपी प्रश्न सोडवावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

श्रावणामुळे भीमाशंकरात भाविकांची वाढती गर्दी; दिवसभर दर्शन व्यवस्था सुरू ठेवण्याची मागणी

मंचर (समर्थ गांवकरी)

उत्तर भारतातील श्रावण महिन्याला सुरुवात झाल्याने बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर येथे भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे.महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश,मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात आणि इतर राज्यांतूनही शिवभक्त दर्शनासाठी येत असल्याने मंदिर परिसरात भक्तांची वर्दळ वाढली आहे.

सध्या मंदिर परिसरात विविध विकासकामे सुरू असल्याने सकाळी ७ ते ११ या वेळेतच दर्शनाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यानंतर विकासकामांसाठी मंदिर परिसरातील काही भाग बंद ठेवला जात असल्याने दुपारनंतर येणाऱ्या भाविकांना दर्शन न घेता परत जावे लागत



आहे.त्यामुळे अनेक भक्तांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.विशेषतः सुट्टीचे दिवस आणि श्रावणातील सोम वारच्या दिवशी हजारो भाविक भीमाशंकर येथे येत असल्याने चार तासांची दर्शन व्यवस्था अपुरी ठरत आहे.त्यामुळे विकासकामांचे योग्य नियोजन करून दिवसभर दर्शनाची व्यवस्था सुरू ठेवावी, अशी मागणी भाविक आणि स्थानिक व्यावसायिकांकडून वारंवार केली जात आहे.दर्शनासाठी दूरवरून येणाऱ्या भाविकांचा वेळ, प्रवास आणि खर्च लक्षात घेऊन मंदिर प्रशासनाने पर्यायी व्यवस्था करावी, तसेच विकासकाम ांसोबत दर्शन व्यवस्थेत अडथळा येणार नाही यासाठी नियोजन करावे,अशी अपेक्षा भक्तांकडून व्यक्त होत आहे.

वसुंधरा अॅकॅडमीचे २० विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र तर राज्यस्तरीय ज्ञानोदय इंग्रजी व्याकरण परीक्षेत दैदिप्यमान कामगिरी

गुणवंतांचा गौरव, लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

अकोले (समर्थ गांवकरी)

अभिनव शिक्षण संस्थेच्या वसुंधरा अॅकॅडमी, अकोले येथे इयत्ता चौथी व सातवी शिष्यवृत्ती परीक्षा २०२५–२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख , उपप्राचार्या राधिका नवले तसेच उपस्थित पालकांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन करण्यात आले. ओवी सातपुते, आदिती मिसाळ, ऊर्जित बंगाळ व ईशान्वी चासकर या विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रभावी भाषणे केली. श्रेया वाकचौरे हिने नृत्य सादर केले.

शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता चौथीचे ११ व इयत्ता सातवीचे ९ असे एकूण २० विद्यार्थी पात्र ठरले. शिष्यवृत्ती परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी,

इयत्ता चौथी : शेळके आरोही महेश , पवार सुमेध उत्तम, वाकचौरे अर्णव संतोष, नवले अर्णव गिरीश, परामण्य पराग माखन, नाईकवाडी गायत्री अविनाश,



परामण्य पारस माखन, म्हस्के श्रीराज सतीश, हासे यश पवन, शिरतार रणवीर कैलास व मालुंजकर आयांती किरण या विद्यार्थ्यांना शकुंतला भांगरे, कल्याणी आंबरे, शुभदा निकम व अरुणा बगनर यांनी मार्गदर्शन केले.

इयत्ता सातवी : कोल्हाळ समर्थ अंकुश, काळे गार्गी देविदास, जाधव सिद्धी अदिनाथ, हासे आर्यन संजय, काकड तन्वी सूर्यभान, कुलकर्णी स्पृहा सचिन, जाधव ऋद्धी अदिनाथ, धिंदळे अदिती बाळू व गायकवाड मयुरेश गणेश यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले. याचबरोबर जिनियस अॅकॅडमी आयोजित राज्यस्तरीय ज्ञानोदय इंग्रजी व्याकरण परीक्षेतही वसुंधरा अॅकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. इयत्ता दुसरीतील राघव मयूर रासने याने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक (१८६ गुण) मिळविला. इयत्ता तिसरीतील ऊर्जित दर्शन बंगाळ (केंद्रीय स्तर प्रथम), प्रियदर्शिनी रविंद्र गोर्डे (केंद्रीय स्तर द्वितीय), शिवार्जुन सचिन कोटकर (जिल्हास्तर पाचवा),शौर्य दिग्विजय जोशी व अनुज विकास वनवे (जिल्हास्तर प्रथम) यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. इयत्ता चौथीतील गायत्री अविनाश नाईकवाडी हिने जिल्हास्तरावर चौथा क्रमांक, इयत्ता पाचवीतील वेदांत युवराज आरोटे याने केंद्रीय स्तरावर प्रथम, तर ऋत्विक संजय वरसाळे याने जिल्हास्तरावर चौथा क्रमांक मिळविला. इयत्ता सहावीतील स्वराज सुनील पवार याने केंद्रीय स्तरावर प्रथम, तनिष्का विकास चौरे हिने जिल्हास्तरावर द्वितीय, तर शिवरत्न भूषण साठे याने राज्यस्तरावर तृतीय क्रमांकासह ₹५०० चे रोख पारितोषिक मिळविले. इयत्ता सातवीतील सिद्धी अदिनाथ जाधव हिने केंद्रीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावत शाळेच्या यशात भर घातली.

या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन, नियमित सराव परीक्षा, वैयक्तिक शंका–निरसन, पालकांचे सहकार्य, विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन वर्ग, अभ्यास साहित्य, प्रश्नपत्रिका सराव व सातत्यपूर्ण मूल्यमापनाच्या माध्यमातून सक्षम तयारी करून देण्यात आली.

स्नेहालय उडान प्रकल्पांतर्गत पारनेर मध्ये 'माझी शाळा, बालविवाहमुक्त शाळा' अभियान

बालविवाहाला मदत करणाऱ्या आई-वडिलांसह उपस्थित असणारे संपूर्ण वऱ्हाड, नातेवाईक, धर्मगुरू, मंडप, बँड-डीजेवाल्यांवरही गुन्हा दाखल होऊ शकतो

पारनेर (समर्थ गांवकरी)

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करून न्यू इंग्लिश स्कूल, पारनेर येथे स्नेहालय उडान प्रकल्पांतर्गत 'माझी शाळा, बालविवाहमुक्त शाळा' अभियानाचा जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.

विद्यार्थ्यांमध्ये बालविवाह, बाल लैंगिक शोषण, बालहक्क आणि मुलींच्या सुरक्षिततेबाबत जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पारनेर पोलीस निरीक्षक संतोष खेडकर होते. यावेळी उडान प्रकल्पाचे व्यवस्थापक प्रवीण कदम, युवा निर्माण प्रकल्पाचे विकास सुतार, शाळेचे प्राचार्य के. बी. शिंदे, पर्यवेक्षक अजित दिवटे, ज्युनियर कॉलेज समन्वयक सतीश फापाळे, जुलेखा शेख, मनिषा जगदाळे, बापुराव होळकर,युवा नेते नियाज राजे, सामाजिक कार्यकर्ते शशिकांत शिंदे, नेहा धिवरे, पत्रकार भगवान गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविकात ज्ञानेश्वर कवडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यानंतर उडान प्रकल्पाचे व्यवस्थापक प्रवीण कदम यांनी विद्यार्थ्यांना बालविवाह कायदा, त्याचे दुष्परिणाम, बाल लैंगिक शोषणापासून संरक्षण देणारा कायदा, बालकांचे हक्क व अधिकार आणि मुलींच्या सुरक्षिततेबाबत संवेदनशील मार्गदर्शन केले. न कळत केलेली एखादी चूक आयुष्यभरासाठी संकट निर्माण करू शकते, हे विविध उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समजावून सांगताना कदम यांनी प्रेमाचे आकर्षण, सोशल मीडिया, अनोळखी व्यक्तींशी वाढणारी मैत्री आणि त्यांच्या आमिषांना बळी पडण्याचे धोके याबाबत सावध केले.

मुलींनी स्वतःच्या सुरक्षिततेसाठी विशेष काळजी घेण्याचे आवाहन करताना अनोळखी व्यक्तीच्या बोलण्यावर किंवा आमिषावर विश्वास ठेवू नये,



कोणतीही व्यक्ती काही खाण्यापिण्याचे पदार्थ देत असेल तर ते घेऊ नये, अनोळखी व्यक्तीसोबत कुठेही जाऊ नये, वैयक्तिक माहिती किंवा फोटो शेअर करू नयेत तसेच काही संशयास्पद किंवा चुकीचे घडत असल्यास तात्काळ पालक, शिक्षक किंवा विश्वासातील व्यक्तीला सांगावे, असे मार्गदर्शन त्यांनी केले.

बालविवाहाच्या संदर्भात बोलताना कदम यांनी सांगितले की, मुलीचे विवाहाचे किमान वय १८ वर्षे आणि मुलाचे २१ वर्षे आहे. बालविवाहामुळे मुलीचे शिक्षण, आरोग्य, मानसिक स्वास्थ्य, सुरक्षितता आणि भविष्यातील संधी धोक्यात येतात. बालविवाह हा केवळ सामाजिक प्रश्न नसून कायद्याने गंभीर गुन्हा आहे.

जाहीर नोटीस

मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर–आंबेगाव यांचे कोर्टात...

क्र. फौज जन्म–मृत्यू/एसआ/२५०/२६ दिनांक: ३१/०७/२०२६

श्री. अनिल दत्तात्रय रायकर, रा. राजुरी, ता.जुन्नर, जि.पुणे ...अपिलार्थी

विरुद्ध..... निबंधक, जन्म – मृत्यू नोंदणी अधिकारी

ग्राम अधिकारी/ मुख्याधिकारी .....**प्रतिवादी**

ग्रामपंचायत राजुरी

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार **श्री. अनिल दत्तात्रय रायकर, रा. राजुरी, ता.जुन्नर, जि.पुणे** यांचा/ यांची स्वतः नामे **अनिल दत्तात्रय रायकर** यांचा / हिचा **जन्म** दिनांक **०१/०७/१९७८ रोजी मौजे राजुरी**, ता. जुन्नर जि.पुणे येथे झालेले आहे. यांचा **जन्म** नोंदीचा हुकूम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ **२५०/२६** दिनांक **१५/०५/२०२६** रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. ३१/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनिशी ही जाहीर नोटीस दिली असे.

(अर्चना तांबे)

अति. उपविभागीय दंडाधिकारी

जुन्नर – आंबेगाव उपविभागीय मंचर (पुणे)

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २३१ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

मंगळवार, दि. ०४ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

एअर इंडिया इमारतीच्या नूतनीकरणात लोकाभिमुख प्रशासकीय रचनेला प्राधान्य द्यावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : राज्य शासनाच्या विविध शासकीय विभागांच्या गतिमान आणि सुलभ कार्यपद्धतीच्या दृष्टीने एअर इंडिया इमारतीचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. नूतनीकरण करताना लोकाभिमुख प्रशासकीय रचनेला प्राधान्य देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे दिले.

वर्षा शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एअर इंडिया इमारतीसंदर्भातील सादरीकरण करण्यात आले, त्यावेळी त्यांनी संबंधितांना निर्देशित केले. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह अन्य संबंधित वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, मुख्य सचिव यांनी याबाबत संबंधितांची एक बैठक घेऊन सविस्तर चर्चा करुन सुयोग्य नियोजन करावे. विविध शासकीय विभागांतील कोणत्या विभागांचे स्थलांतर एअर इंडियाच्या नूतनीकरण इमारतीत करणे हे प्रशासकीय आणि नागरिकांच्या दृष्टीने सोयीचे ठरेल हे पाहावे. या ठिकाणी प्रशासकीय कार्यपद्धती ही सुलभ आणि लोकाभिमुख होईल यास प्राधान्य द्यावे. त्यानंतर याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओ पी गुप्ता, विकास चंद्र रस्तोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव (विशेष चौकशी अधिकारी) पंकज कुमार, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता प्रज्ञा वाळके; तसेच अन्य संबंधित वरिष्ठ अधिकारी, वास्तुविशारद उपस्थित होते. संभाव्य नूतनीकरण आराखड्यांचे सादरीकरण संबंधित वास्तुविशारदांद्वारे करण्यात आले.



नीट यूजी काऊन्सिलिंगचे वेळापत्रक जाहीर; '५ ऑगस्ट २०२६' तारखेपासून सुरू होणार नोंदणी प्रक्रिया!

नवी दिल्ली : वैद्यकीय प्रवेशाची वाट पाहणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांसाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी समोर आली आहे. मेडिकल काऊन्सिलिंग कमिटी (MCC) ने 'नीट यूजी २०२६' (NEET UG 2026) च्या समुपदेशन प्रक्रियेचे अधिकृत वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. एमसीसीने जाहीर केलेल्या या कार्यक्रम नुसार पहिल्या फेरीसाठीची ऑनलाइन नोंदणी ५ ऑगस्ट २०२६ पासून सुरू होणार आहे. तसेच या पहिल्या फेरीत विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी १२ ऑगस्ट २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. ही काऊन्सिलिंग प्रक्रिया देशातील १५ टक्के ऑल इंडिया कोटा (ll India Quotas) आणि एमसीसीच्या अखत्यारीत येणाऱ्या इतर संस्थांमधील एमबीबीएस (MBBS), बीडीएस (BDS) आणि बी.एससी. नर्सिंग या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आयोजित केली जात आहे.



यंदाची नीट परीक्षा अत्यंत वादग्रस्त आणि संघर्षाची ठरली. ३ मे २०२६ रोजी पार पडलेली मूळ परीक्षा पेपर फुटीच्या गंभीर आरोपांमुळे रद्द करावी लागली होती. त्यानंतर २१ जून २०२६ रोजी ही फेरपरीक्षा पुन्हा घेण्यात आली. फेरपरीक्षेनंतर १६ जुलै २०२६ रोजी छएएढ णऋ २०२६ चा अंतिम निकाल जाहीर करण्यात आला. या परीक्षेत देशभरातून एकूण ११.२१ लाख उमेदवार पात्र ठरले आहेत. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यापासून प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होत असल्याने विद्यार्थ्यांची प्रतीक्षा अखेर संपली आहे.

पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचा मनस्ताप आणि राजकीय वादळ : नीट पेपर फुटीच्या या प्रकरणामुळे देशभरातील जवळपास २२ लाख विद्यार्थ्यांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागला. या तणावापोटी दुर्दैवाने २२ विद्यार्थ्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलल्याने संपूर्ण देश सुन्न झाला होता.

वडज धरणाच्या मीना नदीला पूर, मेहेर व नेवकर पुल वाहतुकीसाठी बंद

शिवनेरी (समर्थ गांवकरी)



वडज धरण परिसरात गेले काही दिवसांपसून मुसळधार पाऊस कोसळत आहे . यामुळे मिना नदीला पूर आला आहे .मेहेर व नेवकर पुलावरून मोठ्या प्रमाणात पाणी वाहत असल्यामुळे नारायणगाव व वारुळवाडी ग्रामपंचायत ने वाहतुकीसाठी हा पुल बंद करण्यात आला आहे .

मीना नदी पात्रात किंवा पुलावरून कोणीही व्हिडिओ शूटिंग किंवा फोटो स्टाईलने काढू नये . नदीपात्रामध्ये कधीही पाणी वाढण्याची शक्यता आहे . त्यामुळे नागरिकांनी सुरक्षिततेची काळजी घ्या. शेतकरी बांधवांनी , महिला भगिनी , पुरुष बांधवांनी, ज्येष्ठ नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी नारायणगावच्या मोठ्या पुलावरून वाहतुकीसाठी वापरावा. मीना नदी पात्रातील काठाजवळील सर्व शेतकरी बांधवांनी जलसंपदा विभागामार्फत आव्हान करण्यात येत आहे की , पाऊस मोठ्या प्रमाणात सुरू असल्यामुळे आपली जनावरे , जीवनावश्यक वस्तू, दैनंदिन प्रक्रिया सुरक्षित ठिकाणी सुरू करावी. मीना नदीपात्रा जवळील मंदिर व विद्युत मोटार ठिकाणी जातानी पाण्याचा प्रवाहाचा दक्षता घ्या अशी सूचना संबंधित अधिकाऱ्याकडून करण्यात आलेली आहे . सांडवा नदीद्वारे ८ क्युसेक्स सोडण्यात आला आहे . धरण परिसरात ३८मिलिमीटर मध्ये पाऊस पडला आहे . धरणाची टक्केवारी ८९ . ९९ आहे . वडज धरणातील परिसरात सातत्याने पाऊस कोसळत असल्यामुळे पाणीसाठा मध्ये वाढ होत आहे . नागरिकांनी सतर्क व सुरक्षित राहावे यासाठी जुन्नर पोलीस स्टेशन व नारायणगाव पोलीस स्टेशन ठिकठिकाणी सूचना देत आहेत.

एनडीएची मंगल मिलन बैठक मंगळवार ४ ऑगस्ट रोजी होणार

नवी दिल्ली : संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या तिसऱ्या आठवड्याचे कामकाज सोमवार ३ ऑगस्टपासून सुरू झाले आहे. निवडक महत्त्वाच्या विधेयकांवर संसदेत चर्चा सुरू आहे तर अँटी पेपर लीक हे महत्त्वाचे विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजूर झाले आहे. सत्ताधारी चर्चेस उत्सुक असताना विरोधक घोषणाबाजी करण्यात गुंतले असल्याचे चित्र वारंवार दिसत आहे. संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी राज्यसभेत बोलताना विरोधी पक्षनेत्याला कडक शब्दात सुनावले. चर्चेसाठी वारंवार संधी देऊनही विरोधक विधेयकावर चर्चा करण्यास उत्सुक नसल्याचे रिजिजू म्हणाले आणि वातावरण तापले. या पार्श्वभूमीवर भाजपने एनडीए मंगल मिलन बैठकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे.



भाजपच्या संसदीय पक्षाने काढलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार एनडीएची मंगल मिलन बैठक मंगळवार ४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता संसद भवनातील ग्रंथालयात जी. एम. सी. बालायोगी सभागृहात होणार आहे. या बैठकीसाठी एनडीएतील सर्व घटक पक्षांच्या प्रतिनिधींना बोलावले आहे.

परंपरेनुसार एनडीएच्या घटक पक्षांची मंगल मिलन बैठक अधिवेशन काळात प्रत्येक आठवड्याच्या मंगळवारी होत आहे. यंदाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर एनडीएची पहिली मंगल मिलन बैठक मंगळवार २१ जुलै २०२६ रोजी झाली. यानंतर २८ जुलैच्या मंगळवारीही बैठक झाली. आता ४ ऑगस्ट रोजी बैठक होणार आहे. ही यंदाच्या अधिवेशन काळातील एनडीएच्याघटक पक्षांची तिसरी बैठक आहे. या बैठकीच्या माध्यमातून एनडीएच्या घटक पक्षांतील समन्वय वाढवण्यावर भर दिला जात आहे. तृणमूल काँग्रेसमधून बाहेर पडलेले आणि आता एनसीपीआयमध्ये असलेले खासदार पण या बैठकीला येणार आहेत. मंगल मिलन बैठक ज्ञानवर्धक असतात. या बैठकांतून खूप मौल्यवान असे मार्गदर्शन मिळत असल्याचे तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी सांगितले.

अकोले तालुक्यातील ढोकरी (अंबिकानगर) ग्रामपंचायतीला 'आदिशक्ती अभियान २०२५-२६'मध्ये तालुकास्तरीय प्रथम क्रमांक!

अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील ढोकरी (अंबिकानगर) ग्रामपंचायतीने महाराष्ट्र शासनाच्या 'आदिशक्ती अभियान २०२५–२६' अंतर्गत महिला सक्षमीकरण, सामाजिक विकास आणि आर्थिक प्रगती या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याच्या जोरावर तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत मानाचा बहुमान मिळविला आहे.

ग्रामपंचायतीच्या माध्यमातून महिला बचत गटांचे सक्षमीकरण, महिलांना स्वावलंबनाकडे प्रोत्साहन, अंगणवाडी व आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे तसेच शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी यावर सातत्याने भर देण्यात आला. ग्रामपंचायत, महिला लोकप्रतिनिधी, विविध शासकीय यंत्रणा आणि ग्रामस्थ यांच्या समन्वित प्रयत्नांतून हे यश संपादन झाले आहे.

या यशाचे श्रेय सरपंच सौ. शैला भगवान करवर, उपसरपंच श्री. किसन रेवजी शेटे, ग्रामसेवक श्री. अशोक कडनर, सर्व ग्रामपंचायत सदस्य, महिला लोकप्रतिनिधी, महिला बचत गटांच्या अध्यक्षा व सचिव, अंगणवाडी सेविका व मदतनीस, आशा सेविका, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच समस्त ग्रामस्थ यांच्या एकजुटीच्या कार्याला दिले जात आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल ग्राम पंचायतीवर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, भविष्यातही शासनाच्या विविध विकासात्मक व लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून ढोकरी (अंबिकानगर) ग्रामपंचायत आदर्श ग्रामपंचायत म्हणून अधिक सक्षम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

एकजुटीने काम करूया... प्रगत, सक्षम आणि आदर्श ग्रामपंचायत घडवूया! हा संदेश या यशातून पुन्हा अधोरेखित झाला आहे.

शाळा परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी शिक्षण संस्थेच्या चालकांना पो.नि.दराडे यांच्याकडून नोटिसा

नेवासा (समर्थ गांवकरी)

नेवासा पोलीस स्टेशन हददीमध्ये शाळा,कॉलेज महाविद्यालय शिक्षण संस्थेच्या प्रमुखांना शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या सुरक्षतेच्या दृष्टीने आपल्या शाळा परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी नोटीसा बजावल्या आहे



शिक्षण संस्थाना नोटीस देतांना पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी म्हटले आहे की आपण शिक्षण संस्थेची निगराणी करीत आहात,अहिल्यानगर शहरातील मागील काही घडलेल्या घटनांचा विचार करता आपल्या अधिपत्याखालील शिक्षण संस्थेला कोणत्याही प्रकारची इजा पोहचु नये या दृष्टीकोनातुन शिक्षण संस्थेची सुरक्षततेची जबाबदार आपण व आपले कमिटीतील सदस्यांची देखील आहे

आपले शाळा/कॉलेज/महाविदयालय सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन आपण आपले शिक्षण संस्था ठिकाणी शाळा/कॉलेजचा बाहेरील परीसर व महत्वाचे ठिकाणी सी.सी.टी.व्ही कॅमेरे लावावीत,मुख्य प्रवेशद्वारावर आणि बाहेरील परीसरात सुरक्षा रक्षकांची नेमणुक करावी.

शाळा/कॉलेजचे ओळखपत्र विद्यार्थी विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर स्टाफ यांना दयावीत व ते दर्शनी भागात परीधान करणे अनिवार्य करावे. तसेच ओळखपत्र नसलेल्या बाहेरील कोणल्याही व्येक्तीला किंवा मुलांना परीसरात थांबण्यास सक्त मनाई करावी असे स्पष्ट केले आहे

आपल्या शिक्षण संस्थेतील शिक्षक शिक्षकेतर स्टाफ यांनी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनी त्यांच्याबाबत काही गैरवर्तन होत असल्याबाबत तक्रार केल्यास त्याची माहीती त्यांना तात्काळ सांगावी तसेच स्थानिक पोलीस स्टेशनला माहीती दयावी किंवा डायल ११२ ला कॉल करुण माहीती कळवावी जेणे करुन शाळा / कॉलेज किंवा परिसरातील ठिकाणी एखादा अनुचित प्रकार घडल्यास त्याचा शोध घेणे सोईस्कर होईल.

आपण आम्ही दिलेल्या सुचनांप्रमाणे शिक्षण संस्थेच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन आम्ही सुचविलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करावी. आम्ही दिलेल्या सुचनांकडे दुर्लक्ष करुन शाळा/कॉलेज/महाविद्यालय संस्थेच्या संरक्षणाचे दृष्टीकोनातुन कोणत्याही प्रकारच्या उपाय योजना न केल्यास व त्या ठिकाणी अनुचित प्रकार घडुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी आपणास जबाबदार धरण्यात येईल याची आपण नोंद घ्यावी असा इशारा पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी नोटीसीद्वारे दिला आहे.

> नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी गजबजलेल्या नेवासा शहर,नेवासा फाटा परिसरात व कुकाणा येथे लोक सहभागातून जनतेच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहे त्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांनी चांगलाच धसका घेतला आहे. आता शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या सुरक्षतेच्या दृष्टीने नोटिसा द्वारे सूचित केल्याने शिक्षण संस्थेच्या चालकांनी व व्यवस्थापनाने देखील सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत अशी मागणी पालक वर्गातून केली जात आहे

कोटमारा धरण पूर्ण क्षमतेने भरले.!

शेतकऱ्यांनी केले जलपूजन

घारगाव (समर्थ गांवकरी)

संगमनेर तालुक्यातील पठार भागात ९० व्या शतकात कोटमारा धरणाची निर्मिती झाली. तेव्हापासून पठार भागातील शेतकऱ्यांच्या उन्नतीमध्ये महत्त्वाचे धरण मानले जाते.अनेक नैसर्गिक संकटांवर मात करत वरून राजा मोठ्या प्रमाणावर बरसल्याने अखेर कोटमारा धरण सोमवार (दि.३ जुलै) रोजी पूर्ण क्षमतेने भरले. पठार भागातील नेते मंडळींसह, शेतकरी व ग्रामस्थांनी जलपूजन करीत गंगा मातेला साडी, चोळी अर्पण करून महाआरतीने आनंदोत्सव साजरा केला.

अकोले तालुक्यातील पठार भागातील पाणलोट क्षेत्रात वनविभाग,कृषी विभागाचे माध्यमातून वृक्षारोपण ,आडवे चर, खड्डे खांडण्याचे काम चांगल्या प्रकारे झाले असल्याने संगमनेर तालुक्याच्या सरहद्दीवरील पाणलोट क्षेत्रात गेल्या महिनाभरापासून पावसाची संततधार सुरु आहे.त्यामुळे ओढे,नाले, नदी तुडूंब भरून वाहू लागल्याने अखेर सोमवारी धरण पूर्ण क्षमतेने भरले.

पठार भागातील सरपंच, उपसरपंचांसह जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्यसह अनेक शेतकरी व ग्रामस्थांनी कोटमारा धरणावर हजेरी लावत जलपूजन केले. कोटमारा धरणावर गंगा मातेला साडी, चोळी अर्पण करीत महाआरती केली.

कोटमारा धरण पठार भागातील कुरकुटवाडी, बोटा, आंबी दुमाला, जाचकवाडी परिसरातील वाडी, वस्त्यांसाठी वरदान ठरले आहे.हे धरण भरल्याने या परिसरातील शेतकऱ्यांचा वर्षभर शेतीसाठी पाणी सिंचन आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले.परंतु धरणात पाणी साठा कमी झाला असून भावी काळात धरणातील गाळ,माती उपसा होणे आवश्यक आहे. तसेच धरणात अनेक प्रकारचे अतिक्रमण वाढले असून ते हटवणे काळाची गरज आहे.



यावेळी माजी जि.प. सदस्य अजय फटांगरे, पठार भाग युवक काँग्रेसचे अध्यक्ष बाळासाहेब कुऱ्हाडे, पोलीस पाटील शिवाजी शेळके,भाऊ शिंदे सरपंच नूतन कुरकुटे ,उपसरपंच बाळासाहेब कुरकुटे, प्रमोद कुरकुटे, निखिल कुरकुटे, तुकाराम कुरकुटे ,विश्वास कुरकुटे ,राहुल कुरकुटे , दत्तात्रय शिंदे ,सुरेश हांडे,ग्रा. पं. सदस्य पुष्पा कुरकुटे, शकुंतला कुरकुटे, यशवंती नरवडे आदी शेतकरी उपस्थित होते.

> पठार भागासाठी कोटमारा धरण वरदान आहे. कोटमारा पूर्ण क्षमतेने भरल्याने पठार भागातील अनेक वाड्या, वस्त्यांवरील पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याचा प्रश्न सुटला तब्बल वर्षभर मिटल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानचे वातावरण आहे.
>
> **–अजय फटांगरे, माजी जि.प. सदस्य.**

> कोटमारा धरण भरल्याने लाभक्षेत्रातील शेतकरी आता पुढील वर्षभर चिंतामुक्त झाला आहे. आंबी दुमाला, कुरकुटवाडी, बोटा,जाचकवाडी परिसरातील वाड्या–वस्त्यांवरील शेतकऱ्यांसह आजी, माजी सरपंच, उपसरपंचांसह ग्रामस्थांनी गंगा मातेला साडी, चोळी अर्पण करुन, महाआरतीने आनंदोत्सव साजरा केला.
>
> **– बाळासाहेब कुऱ्हाडे युवक काँग्रेसचे अध्यक्ष**

नवे क्षितीज नवी पहाट, फुलावी आयुष्यातील स्वप्नांची वाट, स्मितहास्य तुमच्या चेहर्यावर राहो, तुमच्या पाठीशी हजारो सूर्य तळपत राहो.



महाराष्ट्र राज्यातील
नामवंत उद्योजक

मा. गौरवजी फटांगरे साहेब

आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा



डॉ.विश्वास आनंदराव आरोटे

प्रदेश सरचिटणीस : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई

संपादक : दैनिक **समर्थ गांवकरी**

संपादक : **AVP NEWS** Channel

संपादक : **समर्थ गांवकरी NEWS** Channel

संचालक : अकोले प्रा.वि.शे.सह.पतसंस्था मर्या; अकोले

मोबा.९४२३३८८५०८ / ९४२३४६७२७२

परमेश्वर आपणास उदंड, निरोगी व यशस्वी आयुष्य देवो, आपल्या कार्यकर्तृत्वाला नवनवीन यश लाभो आणि आपल्या हातून समाजसेवेचे कार्य अखंडपणे घडत राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या
कायदेविषयक सल्लागार
तथा ठाणे व सर्वोच्च न्यायालयातील
नामांकित विधीतज्ज्ञ

ॲड.रचनाताई भालके

आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा





डॉ.विश्वास आनंदराव आरोटे

प्रदेश सरचिटणीस : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई

संपादक : दैनिक **समर्थ गांवकरी**

संपादक : **AVP NEWS** Channel

संपादक : **समर्थ गांवकरी NEWS** Channel

संचालक : अकोले प्रा.वि.शे.सह.पतसंस्था मर्या; अकोले

मोबा.९४२३३८८५०८ / ९४२३४६७२७२

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

एन.के.टी. शिक्षण संस्थेचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न!

गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव; डॉ. विश्वासराव आरोटे यांचा विशेष सत्कार, प्रेरणादायी भाषणाने विद्यार्थ्यांना दिली यशाची दिशा!

















ठाणे : (स. गांवकरी)

शेठ त्रिभुवनदास जमनादास एज्युकेशन सोसायटीच्या वतीने आयोजित वार्षिक शैक्षणिक पारितोषिक वितरण समारंभ-२०२६ सोमवारी (दि. ३ ऑगस्ट) एन.के.टी. सभागृह, ठाणे येथे अत्यंत उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात पार पडला. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके, प्रमाणपत्रे आणि सन्मानचिन्हे देऊन गौरव करण्यात आला.

या समारंभात शेठ त्रिभुवनदास जमनादास हायस्कूल, शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला कनिष्ठ वाणिज्य महाविद्यालय, शेठ जयंतीलाल त्रिभुवनदास ठाणावाला कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तसेच शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला इंग्रजी माध्यम विद्यालय व कनिष्ठ वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथील विविध शाखांतील गुणवंत विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी सरस्वती व महालक्ष्मी यांचे पूजन व दीप प्रज्वलन करून प्रारंभ करण्यात आला. या संस्थेच्या सर्व विद्यालयातील टॉपर विद्यार्थ्यांना विविध साहित्य देऊन त्यांचा येतोच सन्मान करण्यात आला आपल्या पाल्यांचा होणारा सन्मान हा आपल्या भविष्यकाळातील प्रेरणादायी असल्याचे देखील पालकांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्री. बाळासाहेब पाटील (आयपीएस), उप पोलीस आयुक्त, विभाग १, ठाणे, मान्यवर पाहुणे म्हणून डॉ. संभाजी शिवाजीराव डांगे, तर विशेष अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे मुख्य संपादक डॉ. विश्वासराव आरोटे सरळगाव ग्रामपंचायत माजी सरपंच सुवर्णाताई ठाकरे माझी प्राचार्य राजेंद्र पुरानीक.थोर समाजसेवक राजेंद्र पांडे.उपस्थित होते.

यावेळी संस्थेच्या वतीने डॉ. विश्वासराव आरोटे यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि चांदीची प्रभू श्रीरामांची आकर्षक मूर्ती देऊन विशेष सत्कार करण्यात आला. पत्रकारिता, सामाजिक कार्य, शिक्षण क्षेत्रातील योगदान तसेच समाजोपयोगी उपक्रमांबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या सत्कारावेळी संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले.

सत्काराला उत्तर देताना डॉ. विश्वासराव आरोटे यांनी आपल्या जीवनप्रवासातील अनेक प्रेरणादायी अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले. "मी स्वतः शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी होतो. शाळेत असताना वर्गातील शेवटच्या बाकावर बसणारा आणि अभ्यासात मागे असलेला विद्यार्थी म्हणून माझी ओळख होती. पण शिक्षकांचे मार्गदर्शन, कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर आज समाजात विविध क्षेत्रांत काम करण्याची संधी मिळाली," असे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, "विद्यार्थ्यांच्या आयुष्यात शिक्षक हे कुंभारासारखे असतात. जसा कुंभार मातीला आकार देतो, तसे शिक्षक विद्यार्थ्यांचे भविष्य घडवतात. शिक्षकांनी रागावले किंवा शिक्षा केली म्हणून त्यांच्याविषयी मनात कटुता ठेवू नका. त्या शिक्षेमागे विद्यार्थ्याला घडविण्याची तळमळ असते."

आपल्या शालेय जीवनातील एका प्रसंगाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, एका शिक्षकांनी दिलेल्या शिक्षेनंतर आपण स्वतःला सिद्ध करण्याचा निर्धार केला आणि गणित विषयात उल्लेखनीय गुण मिळवून विद्यालयात तिसरा क्रमांक पटकावला. "अपयश हे शेवट नसून नव्या यशाची सुरुवात असते," असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

डॉ. आरोटे यांनी पालकांनाही महत्त्वपूर्ण संदेश देत सांगितले की, "मुलांना केवळ गुणांसाठी नव्हे तर चांगला माणूस बनण्यासाठी प्रोत्साहन द्या. शिक्षकांवर विश्वास ठेवा, शाळेशी सातत्याने संपर्क ठेवा आणि मुलांच्या प्रगतीची माहिती घ्या." मोबाईलच्या वाढत्या वापराबाबत चिंता व्यक्त करत त्यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणाला प्राधान्य द्यावे, अभ्यास, संस्कार आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल राखावा, असे आवाहन केले.

त्यांनी आपल्या सामाजिक कार्याची माहिती देताना सांगितले की, गेल्या अनेक वर्षांपासून विद्यार्थ्यांना वह्या, दप्तर, शैक्षणिक साहित्याचे वाटप तसेच दहावी, बारावी, एमपीएससी, यूपीएससीमध्ये यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे. "विद्यार्थ्यांना मिळणारा प्रत्येक सन्मान हा त्यांच्या उज्ज्वल भविष्याचा पाया असतो," असेही त्यांनी नमूद केले.

प्रमुख पाहुणे श्री. बाळासाहेब पाटील (आयपीएस) यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर जीवनात मोठे यश मिळविण्याचे आवाहन केले. डॉ. संभाजी डांगे यांनी शिक्षणाबरोबरच आरोग्य आणि सामाजिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत संस्थेची शैक्षणिक गुणवत्ता अधिक उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू राहतील, अशी ग्वाही दिली.

कार्यक्रमाचे आयोजन शेठ त्रिभुवनदास जमनादास एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव श्री. नटवरलाल विरजीभाई ठक्कर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. वार्षिक अहवाल वाचन प्राचार्या कु. मनीषा जे. ठक्कर, श्रीमती लिडिया सॅलियन यांनी केले तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

समारंभास पालक, माजी विद्यार्थी, शिक्षणप्रेमी नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, प्रेरणादायी मार्गदर्शन आणि मान्यवरांचा सन्मान यामुळे हा शैक्षणिक सोहळा उपस्थितांच्या स्मरणात राहणारा ठरला. यावेळी आभार प्रदर्शन सचिव नटुकाका यांनी मानले तर वंदे मातरम गिताने झाले.... संस्थेने सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा सन्मान चिन्ह बॅक देऊन विशेष सन्मान केला.

थोडक्यात पण महत्वाचे



शशिकांत कांबळे यांचा शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश

पुणे (स. गांवकरी) : पद्मा फाउंडेशनचे संस्थापक शशिकांत कांबळे यांनी आज दिल्ली येथे शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. शिवसेना पक्षाचे युवानेते व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, तसेच खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शशिकांत कांबळे जनहिताचे काम करतील, असा विश्वास पक्षाच्या वतीने व्यक्त करण्यात आला. सामाजिक, पर्यावरणीय तसेच जनहिताच्या विविध विषयांवर पद्मा फाउंडेशनच्या माध्यमातून काम करत असताना समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी अधिक व्यापक स्तरावर काम करण्याची गरज असल्याची भावना श्री. शशिकांत कांबळे यांनी यावेळी व्यक्त केली. "समाजसेवेचा अनुभव आणि जनतेशी असलेला थेट संपर्क याचा उपयोग करून सर्वसामान्य नागरिक, युवक, महिला तसेच पर्यावरणाशी संबंधित प्रश्नांसाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याचा माझा प्रयत्न राहील. शिवसेना पक्षाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विकासासाठी आणि जनहितासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे," असे शशिकांत कांबळे यांनी सांगितले. या प्रवेशामुळे पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रात सामाजिक व जनहिताच्या विविध उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

जिल्हा परिषद पालघर येथे क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी

पालघर जिल्हा (स. गांवकरी) : जिल्हा परिषद पालघर येथे स्वातंत्र्यसैनिक, क्रांतिकारक आणि प्रती सरकारचे जनक क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती आज जिल्हा परिषद पालघर येथे साजरी करण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वपूर्ण योगदान देत ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष उभारला. १९४३ मध्ये सातारा परिसरात त्यांनी स्थापन केलेल्या प्रती सरकारच्या माध्यमातून लोकशाही, स्वराज्य आणि सामाजिक न्यायाचा आदर्श निर्माण केला. त्यांच्या राष्ट्रभक्ती, त्याग आणि लोकहितवादी कार्याचा आदर्श आजही प्रेरणादायी असून, त्यांच्या स्मृतीस यावेळी उपस्थितांनी विनम्र अभिवादन केले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी अशोक पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सचिन कवठे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रकाश हसनाळकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) अतुल पारसकर, जिल्हा कार्यक्रम अधिकारी व्यंकटराव हुंडेकर, जिल्हा कृषी विकास अधिकारी सोमनाथ पिंजारी तसेच जिल्हा परिषदेचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



रतनवाडीत मध्यरात्री भिंत कोसळून आठ महिन्यांच्या चिमुकलीचा मृत्यू

- अतिवृष्टीने आदिवासी भाग हादरला!
- जखमी आईवर उपचार सुरू
- शेंडी प्राथमिक आरोग्य केंद्र बंद असल्याने उपचारास विलंब झाल्याचा आरोप, निष्काळजीपणावर कारवाईची मागणी!



अकोले : (स. गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका आदिवासी भागाला बसत असून, रतनवाडी येथे रविवारी मध्यरात्री घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेत अवघ्या आठ महिन्यांच्या सृष्टी अशोक झडे या चिमुकलीचा घराची भिंत कोसळून मृत्यू झाला. या दुर्घटनेत तिची आई सोनाली झडे गंभीर जखमी झाली असून तिच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

गेल्या दीड-दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक कच्च्या घरांना तडे गेले असून रविवारी मध्यरात्री सुमारे साडेबारा वाजण्याच्या सुमारास अमृता सक्रु झडे यांच्या घराची भिंत अचानक कोसळली. त्यावेळी अशोक झडे, त्यांची पत्नी सोनाली आणि आठ महिन्यांची मुलगी सृष्टी घरात झोपलेले होते. भिंत कोसळताच सोनाली आणि सृष्टी ढिगाऱ्याखाली दबल्या.

आरडाओरड ऐकून अशोक झडे व शेजाऱ्यांनी तातडीने मदतकार्य सुरू करत दोघींना बाहेर काढले. त्यानंतर जखमींना उपचारासाठी शेंडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. मात्र, तेथे डॉक्टर किंवा कर्मचारी उपलब्ध नसल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला. खाजगी वैद्यकीय सेवा मिळू न शकल्याने दोघींना राजूर ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे डॉक्टरांनी सृष्टीला मृत घोषित केले, तर सोनालीवर उपचार सुरू करण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच माजी आमदार वैभव पिचड यांच्या मार्गदर्शनाखाली समाजसेवक अनंत महादू घाणे, सुनील पवार, रामदास पिचड, तुकाराम सारुकते यांच्यासह सहकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी झडे कुटुंबीयांचे सांत्वन करून तहसीलदार मोरे व गटविकास अधिकारी माने यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधत तातडीने पंचनामा करून शासनाकडून आर्थिक मदत देण्याची मागणी केली.

घटनास्थळी तलाठी, मंडळ अधिकारी, कृषी सहाय्यक, वनरक्षक व वनपाल यांसारखे संबंधित अधिकारी वेळेत उपस्थित नसल्याने ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. आदिवासी भागातील अनेक अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी राहत नसून आपत्तीच्या वेळी घटनास्थळी वेळेत पोहोचत नसल्याच्या तक्रारीही ग्रामस्थांनी समाजसेवक अनंत घाणे यांच्याकडे मांडल्या. शासनाच्या आदेशानुसार मुख्यालयी उपस्थित न राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. या घटनेनंतर आदिवासी भागातील धोकादायक घरांचे तातडीने सर्वेक्षण करून सुरक्षित निवारा, आर्थिक मदत, सक्षम आरोग्य सेवा आणि आपत्कालीन यंत्रणा उभारण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे. जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी परिस्थितीचा तातडीने आढावा घेऊन सर्व विभागीय अधिकारी-कर्मचाऱ्यांना मुख्यालयी उपस्थित राहण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

अमृता सक्रु झडे म्हणाल्या, "शेंडी प्राथमिक आरोग्य केंद्र रात्री सुरू असते आणि वेळेत उपचार मिळाले असते, तर आमची आठ महिन्यांची चिमुकली सृष्टी आज आमच्यात असती. आमच्यावर आलेले हे दुःख कोणावरही येऊ नये. आदिवासी भागातील आरोग्य सेवा आणि आपत्कालीन यंत्रणा तातडीने सक्षम करावी." समाजसेवक अनंत महादू घाणे म्हणाले, "आदिवासी भागात आपत्तीच्या वेळी संबंधित अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी पोहोचणे आवश्यक आहे. शासनाच्या आदेशानुसार मुख्यालयी उपस्थित राहून जनतेला आधार द्यावा. झडे कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत द्यावी आणि निष्काळजीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी."

वडज धरणाच्या मीना नदीला पूर; मेहेर व नेवकर पुल वाहतुकीसाठी बंद



शिवनेरी : (स. गांवकरी)

वडज धरण परिसरात गेले काही दिवसांपसून मुसळधार पाऊस कोसळत आहे . यामुळे मिना नदीला पूर आला आहे . मेहेर व नेवकर पुलावरून मोठ्या प्रमाणात पाणी वाहत असल्यामुळे नारायणगाव व वारुळवाडी ग्रामपंचायत ने वाहतुकीसाठी हा पुल बंद करण्यात आला आहे . मीना नदी पात्रात किंवा पुलावरून कोणीही व्हिडिओ शूटिंग किंवा फोटो स्टाईलने काढू नये . नदीपात्रामध्ये कधीही पाणी वाढण्याची शक्यता आहे . त्यामुळे नागरिकांनी सुरक्षिततेची काळजी घ्या. शेतकरी बांधवांनी , महिला भगिनी , पुरुष बांधवांनी, ज्येष्ठ नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी नारायणगावच्या मोठ्या पुलावरून वाहतुकीसाठी वापरावा . मीना नदी पात्रातील काठाजवळील सर्व शेतकरी बांधवांनी जलसंपदा विभागामार्फत आव्हान करण्यात येत आहे की , पाऊस मोठ्या प्रमाणात सुरू असल्यामुळे आपली जनावरे , जीवनावश्यक वस्तू, दैनंदिन प्रक्रिया सुरक्षित ठिकाणी सुरू करावी. मीना नदीपात्रा जवळील मंदिर व विद्युत मोटार ठिकाणी जातानी पाण्याचा प्रवाहाचा दक्षता घ्या अशी सूचना संबंधित अधिकाऱ्याकडून करण्यात आलेली आहे . वडज धरणातील पाणीसाठा पातळी मीटरमध्ये ७१६. ७८० आहे . धरणातून सांडवा नदीद्वारे ८००० क्युसेक्स सोडण्यात आला आहे . धरण परिसरात ३८मिलिमीटर मध्ये पाऊस पडला आहे . धरणाची टक्केवारी ८९ . ९९ आहे .वडज धरणातील परिसरात सातत्याने पाऊस कोसळत असल्यामुळे पाणीसाठा मध्ये वाढ होत आहे . नागरिकांनी सतर्क व सुरक्षित राहावे यासाठी जुन्नर पोलीस स्टेशन व नारायणगाव पोलीस स्टेशन ठिकठिकाणी सूचना देत आहेत.

ब्राम्हणवाडा-बोटा मार्गावरील अवैध दारू अड्ड्यांचा पुन्हा धुमाकूळ

शालेय विद्यार्थी, महिला आणि ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर!

ब्राम्हणवाडा (ता. अकोले) : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा गावाजवळील ब्राम्हणवाडा-बोटा या मुख्य रस्त्यालगत गावापासून अवघ्या अर्धा किलोमीटर अंतरावर दोन ठिकाणी अवैध दारू विक्रीचे अड्डे मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचा गंभीर आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे. या अड्ड्यांवर राज्य उत्पादन शुल्क विभाग (एक्साईज) तसेच अकोले पोलीस ठाण्याच्या पथकांकडून अनेक वेळा धाडी टाकण्यात आल्या असून कारवाईही करण्यात आली. मात्र प्रत्येक कारवाईनंतर काही दिवसांतच हे अड्डे पुन्हा पूर्ववत सुरू होत असल्याने



प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांकडून तीव्र प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

या मार्गावरून दररोज ब्राम्हणवाडा व परिसरातील शेकडो शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनी, महाविद्यालयीन युवक-युवती तसेच महिला ये-जा करतात. त्यामुळे या अवैध दारू अड्ड्यांमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सकाळी शाळेच्या वेळेत आणि सायंकाळी शाळा सुटल्यानंतर या परिसरात मद्यपींचा वावर वाढत असल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या अड्ड्यांवर दररोज मद्यपींची गर्दी होत असून किरकोळ कारणांवरून वाद, भांडणे, मारामाऱ्या, आरडाओरडा आणि अश्लील शिवीगाळ यांसारखे प्रकार घडत असतात. अनेकदा मद्यधुंद अवस्थेतील व्यक्ती रस्त्यालगतच लघुशंका करत असल्याने परिसरातील महिलांना आणि विद्यार्थिनींना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. काही मद्यपींकडून अश्लील हावभाव व अर्वाच्य भाषेचाही वापर होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, या अवैध धंद्यांबाबत वारंवार तक्रारी करूनही आणि वेळोवेळी पोलिसांकडून धाडी टाकूनही संबंधितांवर अशी कोणतीही कठोर कारवाई झालेली दिसून येत नाही की ज्यामुळे हा अवैध व्यवसाय कायमचा बंद होईल. त्यामुळे "कारवाई केवळ कागदोपत्रीच होते का?", असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

काही स्थानिकांच्या दाव्यानुसार, संबंधित दारू विक्रेते उघडपणे "आम्हाला कोणाची भीती नाही, आमच्या पाठीशी वरपर्यंतचा वरदहस्त आहे. आमचे कोणी काहीही बिघडवू शकत नाही," अशा प्रकारची भाषा वापरत असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे या धंद्यांना नेमके कोणाचे संरक्षण मिळत आहे, याचीही चौकशी करण्याची मागणी होत आहे. मात्र या दाव्यांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी झालेली नाही.

ग्रामस्थांच्या मते, हा प्रश्न केवळ अवैध दारू विक्रीपुरता मर्यादित नसून तो आता कायदा व सुव्यवस्था आणि महिला सुरक्षेशी संबंधित गंभीर विषय बनला आहे. भविष्यात एखाद्या शालेय विद्यार्थिनी किंवा महिलेसोबत अनुचित घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा संतप्त सवालही नागरिक उपस्थित करत आहेत.

पत्रकार तसेच दारूबंदी कार्यकर्ते संजय गायकर यांनी या प्रकरणात अकोले पोलीस प्रशासन व राज्य उत्पादन शुल्क विभागाने संयुक्तपणे व्यापक मोहीम राबवून संबंधित अवैध दारू अड्डे कायमस्वरूपी बंद करावेत, अशी मागणी केली आहे. केवळ धाडी टाकून किंवा किरकोळ गुन्हे दाखल करून हा प्रश्न सुटणार नसून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करून या अवैध व्यवसायाचे संपूर्ण उच्चाटन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. ग्रामस्थांनी जिल्हा पोलीस अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच जिल्हा प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन वस्तुस्थितीची चौकशी करावी, संबंधितांवर कठोर कारवाई करावी आणि ब्राम्हणवाडा-बोटा मार्गावरील नागरिक, महिला व विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी केली आहे.

थोडक्यात पण महत्त्वाचे

टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त वाचनरंग ग्रंथालय चा शुभारंभ



नेवासा (समर्थ गांवकरी)

साऊ एकल महिला समितीच्या वतीने दि. १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त वाचनरंग ग्रंथालय या उपक्रमाचा शुभारंभ उत्साहात संपन्न झाला.

अकोले तालुक्यातील एकल महिलांसह सर्व महिलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, ज्ञानाची देवाणघेवाण व्हावी आणि विचार समृद्ध व्हावेत या उद्देशाने हे ग्रंथालय सर्व महिलांसाठी मोफत खुले करण्यात आले आहे. तसेच दर महिन्याला वाचलेल्या पुस्तकांवर खुली चर्चा आयोजित करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाला डॉ. उमा कुलकर्णी, मॉडर्न हायस्कूलच्या प्राचार्या जयश्री ननावरे मॅडम, सौ.अनिता बंगाळ मॅडम, नगरसेविका प्रतिभा मनकर, नगरसेविका शीतल वैद्य आणि नीता मुंदडा यांनी उपस्थित राहून एकल महिलांशी संवाद साधला. मान्यवरांच्या हस्ते झाडाला पाणी घालून पर्यावरणपूरक पद्धतीने ग्रंथालयाचे उद्घाटन करण्यात आले.

राहुल शेवंतेचा वनकुटे येथे सत्कार

सीईटीत मिळविले ९५ टक्के गुण



पारनेर (समर्थ गांवकरी)

वनकुटे गावच्या माजी सरपंच सोनिया शेवंते व ढवळपुरी येथील श्री दत्त ज्वेलर्सचे सर्वेसर्वा उद्योजक राजेंद्र शेवंते यांचे चिरंजीव राहुल शेवंते यांनी सीईटी परीक्षेत ९५ टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल परिसरात सर्वत्र कौतुक होत असून ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

वनकुटे येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थी राहुल शेवंते यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. शिक्षण क्षेत्रात मिळवलेल्या या यशामुळे गावाचे नाव उज्ज्वल झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी ह.भ.प. विकासानंद महाराज मिसाळ, पोलीस उपायुक्त गणेश इंगळे, माजी सरपंच राहुल झावरे, प्रवक्ते मोहनराव रोकडे, उद्योजक राजेंद्र शेवंते, अर्जुन कुलकर्णी, ऋषिकेश गागरे, सुरेश गागरे, रामदास काळे गुरुजी, नारायण गागरे पाटील, भानुदास गागरे, दत्तात्रय शेवंते, रामदास शेलार, साहेबराव गागरे आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राहुल शेवंते यांनी कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीच्या बळावर हे यश मिळविले असून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या यशामुळे गावातील इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

४२ वर्षांनी जुने संवगडी आले पुन्हा एकत्र



गणोरे (समर्थ गांवकरी)

संगमनेर येथील सह्याद्री महाविद्यालयातील १९८४ साली बारावीत असलेले जुने सवंगडी अचानक मैत्र दिनाच्या निमित्ताने संगमनेर येथे तब्बल ४२ वर्षानी एकत्र आले.यावेळी प्रत्येकात कालानुरुप झालेला बदल पाहुन एकमेकाची आस्थेने चौकशी करत होते.महाविद्यायीन काळातील अनेक आनंदाचे क्षण पुन्हा एकदा जिवंत केला यावेळी जुन्या आठवणीना उजाळा देण्यात आला. प्रदीप कर्पे यांच्या निवासस्थानी सर्वांनी एकत्रित येऊन आ. रा.मित्रता दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ❋प्रदीपशेठ कर्पे, मुलगा प्रितम व कर्पे परिवारातील लहान थोर सदस्यांनी मनोभावी सर्वांचे आदरातिथ्य केले. सुरवातीला प्रा. सलिम पठाण यांनी प्रास्ताविक करुन सर्वांची ओळख करुन दिली. यावेळी विजवितरण कंपनीचे सेवानिवृत्त अधिकारी संजय पाबळकर,व्यापारी प्रदीप कर्पे,अमृतवाहीनी इंजिनियरिंग कॉलेज चे सेवा निवृत्त वसंत गुंजाळ, सेवानिवृत्त शिक्षक सलिम पठाण,पत्रकार जगन्नाथ आहेर,अशोक वर्पे,राजेंद्र नेहे आदी उपस्थित होते. सर्वांनी एकमेकाशी संवाद सादत पुन्हा भेटण्याचा निश्चय करीत निरोप घेतला.

‘राजमाता जिजाऊ’च्या ५ अत्याधुनिक एसटी बसेचे लोकार्पण

आमदार दातेंच्या पाठपुराव्याला यश

पारनेर (समर्थ गांवकरी)

शनिवार दि. १ ऑगस्ट २०२६ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम आणि प्रवाशांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आमदार काशिनाथ दाते सरांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आणखी एक यश मिळाले असून, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ’राजमाता जिजाऊ’ बससेवेअंतर्गत पारनेर आगाराला मिळालेल्या पाच अत्याधुनिक एसटी बसेसचे लोकार्पण आज आमदार दाते सरांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले, पारनेर आगाराच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे यापूर्वीही अनेक नवीन बसेस उपलब्ध झाल्या आहेत. आता ’राजमाता जिजाऊ’च्या पाच अत्याधुनिक बसेस पारनेरच्या सेवेत दाखल झाल्याने प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि दर्जेदार प्रवासाचा लाभ मिळणार आहे. कालच नव्याने रुजू झालेले डेपो व्यवस्थापक अमोल कोतकर यांनी पारनेर आगारासाठी पाच नवीन बसेस मंजूर झाल्याची माहिती दिली. आवश्यक चालक पाठविल्यानंतर रात्री उशिरा या बसेस पारनेर आगारात दाखल झाल्या आणि आज नागरिक, महायुतीचे पदाधिकारी तसेच एसटी महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी, चालक व वाहक यांच्या उपस्थितीत या बसेसचे लोकार्पण करण्यात आले, असे त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, पारनेर तालुक्यातील प्रवाशांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असून, भविष्यातही पारनेर आगाराला आवश्यक त्या सर्व सुविधा आणि नवीन बसेस उपलब्ध करून देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत.

यावेळी जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, भाजप तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, ज्येष्ठ पत्रकार संजय वाघमारे, शंकरराव नगरे, दत्ता नाना पवार, नगरसेवक अशोक चेडे, पै. युवराज पठारे, तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, शहरप्रमुख कविता औटी, नवनाथ सोबले, कांतीलाल ठाणगे, शहराध्यक्ष राजेंद्र औटी, संदीपराव रोहोकले, अपर्णा खामकर, लहु भालेकर, विठ्ठल कावरे, माऊली औटी, रामदास दाते, कंट्रोलर कुसकर यांच्यासह एसटी महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी, चालक-वाहक, महायुतीचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आमदार काशिनाथ दाते सर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पारनेर आगाराला ’राजमाता जिजाऊ’च्या पाच अत्याधुनिक एसटी बसेस मिळाल्या, ही पारनेर तालुक्यासाठी आनंदाची बाब आहे. या बसेसमुळे विशेषतः महिला, विद्यार्थिनी, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामीण भागातील प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी व सुलभ प्रवासाची सुविधा मिळणार आहे. जनतेच्या मूलभूत सुविधांसाठी आमदार दाते सर सातत्याने करत असलेले प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत.

- सौ. सुषमा रावडे, तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ गेल्या काही वर्षांत प्रवाशांना अधिक दर्जेदार व आधुनिक सेवा देण्याच्या दिशेने सकारात्मक बदल करत असून, ’राजमाता जिजाऊ’ ही अत्याधुनिक बससेवा त्याचे उत्तम उदाहरण आहे. आमदार काशिनाथ दाते सर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पारनेर आगाराला पाच नवीन बसेस उपलब्ध झाल्या आहेत. या बसेसमधील अधिक आसनक्षमतेमुळे विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. भविष्यातही अशाच आधुनिक सुविधा आणि अधिकाधिक नवीन बसेस पारनेर आगाराला उपलब्ध करून देण्यासाठी एसटी महामंडळाने प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा आहे.

- ज्येष्ठ पत्रकार संजय वाघमारे

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सामाजिक सभागृहाचे भूमिपूजन उत्साहात संपन्न

मा. ना. प्रा. राम शिंदे यांच्या संकल्पनेतून व नगराध्यक्षा प्रांजलताई चिंतामणी यांच्या प्रयत्नांना यश

जामखेड (समर्थ गांवकरी)



महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती मा. ना. प्रा. राम शिंदे यांच्या संकल्पनेतून तसेच जामखेड नगर परिषदेच्या प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ. प्रांजलताई अमितभाऊ चिंतामणी यांच्या विशेष प्रयत्नातून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीचे औचित्य साधून जामखेड शहरातील प्रभाग क्रमांक ४ मधील साठेनगर येथे ’साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सामाजिक सभागृह’ या महत्त्वपूर्ण विकासकामाचे भूमिपूजन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांना चालना मिळावी तसेच साठेनगर परिसरातील नागरिकांना विविध सार्वजनिक कार्यक्रमांसाठी सुसज्ज सभागृह उपलब्ध व्हावे, या उद्देशाने या सामाजिक सभागृहाची उभारणी करण्यात येणार आहे. या कामामुळे परिसरातील नागरिकांची दीर्घकाळापासूनची मागणी पूर्ण होत असून स्थानिक विकासाला नवी दिशा मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी नगराध्यक्षा सौ. प्रांजलताई अमितभाऊ चिंतामणी यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक कार्याचा व साहित्यिक योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करत, त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज व्यक्त केली. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नगर परिषद सातत्याने कटिबद्ध असून नागरिकांच्या मूलभूत सुविधा व सार्वजनिक विकासकामांना प्राधान्य दिले जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

या भूमिपूजन कार्यक्रमास उपनगराध्यक्ष, नगरसेवक, नगरसेविका, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, लहुजी वस्ताद सैनिक, साठेनगर परिसरातील नागरिक तसेच महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

इलेक्ट्रिक स्कुटीला स्कॉर्पिओची धडक ; १६ वर्षीय मुलगी ठार

संगमनेर (समर्थ गांवकरी)



१६ वर्षीय मुलगी शाळेच्या क्लाससाठी इलेक्ट्रिक स्कुटीवरून संगमनेरकडे येत होती, तिच्या ताब्यातील स्कुटीला समोरून भरधाव येणाऱ्या स्कॉर्पिओची धडक बसली. या भीषण अपघातात मुलीचा मृत्यू झाला. हा अपघात रविवारी (दि.०२) सकाळी १० वाजेपूर्वी सातवा मैल फाट्याजवळ पिंपळगाव कोंझिरा (ता. संगमनेर) येथे घडला. या प्रकरणी स्कॉर्पिओ वाहनचालकाविरुद्ध संगमनेर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

आरुषी अनिल कर्पे (वय १६, रा. पिंपळगाव कोंझिरा, ता. संगमनेर) असे मयत मुलीचे नाव आहे. तिचे चुलते भागवत पाटीलबा कर्पे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हेमंत बाळासाहेब गिते (वय ३१, रा. वडाळा महादेव, ता. श्रीरामपूर) असे गुन्हा दाखल झालेल्या वाहनचालकाचे नाव आहे. इलेक्ट्रिक स्कुटीवरून आरुषी कर्पे ही सातवा मैल फाटा या ठिकाणावरून शाळेच्या क्लाससाठी संगम नेरकडे येत होती. संगम नेरच्या दिशेकडून भरधाव येणाऱ्या हेमंत गिते याच्या ताब्यातील स्कॉर्पिओ वाहनाची कर्पे हिच्या स्कुटीला जोराची धडक बसली. गतिरोधक न पाहता त्या ठिकाणी रहदारीचे ठिकाण असतानाही त्याची खबरदारी न घेता निष्काळजीपणाने वाहनाचा वेग मर्यादित न करता वाहन चालवून इलेक्ट्रिक स्कुटीला समोरून जोराची धडक दिली. तिचे वाहनाला अंदाजे २०० फुटापर्यंत ओढत नेऊन तिचे गंभीर दुखापतीस व मृत्यूस कारणीभूत झाला आहे, असेही फिर्यादीत म्हटले असून सहायक पोलिस निरीक्षक व्ही. एन. काळे अधिक तपास करीत आहेत.

पोपटराव थोरात यांचे दुःखद निधन

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)



श्रीगोंदा तालुक्यातील पारगाव सुद्रिक येथील प्रगतशील शेतकरी तसेच साखर उद्योगातील सेवानिवृत्त अधिकारी पोपटराव हंसराज थोरात (वय ८५) यांचे शनिवार दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी हृदयविकाराच्या तीव्र अशा झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा मोठा परिवार आहे. कॉर्पोरेट क्षेत्रातील कंपनी मध्ये उच्च पदावर असलेले संदीप थोरात व हेमंत थोरात यांचे ते वडील होते. कर्तव्यनिष्ठ, मेहनती, कुटुंबवत्सल आणि समाजात आदराचे स्थान असलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व सर्वपरिचित होते. साखर उद्योगात तब्बल ३५ वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावत त्यांनी आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटविला. शेतीची आवड जपत त्यांनी कुटुंब आणि समाजात शांत संयमी, आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून आपली वेगळि ओळख निर्माण केली होती. तरुणांसाठी ते मार्गदर्शक होते. त्यांच्या आकस्मिक निधनाने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली.

शिवसेनाप्रमुखांच्या स्मृतींना हरित अभिवादन

पत्रकारांच्या शुभहस्ते वृक्षारोपण | वृक्षारोपणातून जागवल्या शताब्दीच्या आठवणी.!

संगमनेर (समर्थ गांवकरी)

संगमनेर तालुक्यातील पठार भागातील घारगाव येथे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त रविवार दि.२ ऑगस्ट रोजी शिवसैनिकांनी हरित संकल्पाने भारावलेले वातावरण निर्माण करत वृक्षारोपण ही भविष्य काळाची अत्यावश्यक गरज असल्याचा संदेश वृक्षारोपणातून प्रत्यक्ष कृतीत उतरवला आहे.भारत हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज शेजारील वन विभागाच्या परिसरात विविध जातींच्या ५०० वृक्षांची लागवड करण्यात आली. स्वर्गीय शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देताना पर्यावरण संवर्धन चळवळ अधिक बळकट करण्याचा निर्धार यावेळी शिवसेना पक्षाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

सरसेनापती बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. मातोश्री प्रतिष्ठान, अकोले संगमनेर माजी विद्यार्थी जिल्हाप्रमुख गणेश धात्रक, अमीत फटांगरे यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमात पत्रकार सतीश फापाळे यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करत शुभारंभ करण्यात आला.

यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख सचिन कोते,सहसंपर्क प्रमुख दिलीप साळगट,जिल्हासंघटक अमोल बोऱ्हाडे, विधानसभा संपर्क प्रमुख सूर्यकांत शिंदे, नरेश माळवे, जिल्हा उपप्रमुख जगदीश चौधरी, इम्तियाज शेख, तालुका प्रमुख अमर कतारी,शहरप्रमुख अमित चव्हाण, रवींद्र कानकाटे, उत्तम ढेरंगे रेंगे, योगेश खेमनर, एकनाथ खेमनर,संभाजी धात्रक , गुलाब कोकाटे,फैजल सय्यद, दत्तात्रय शिंदे,संदीप ढेरंगे,आशा केदारी,राजश्री रहाणे, अलका धात्रक, मीनाक्षी धात्रक, वैशाली वडतले, तनुजा रहाणे तसेच श्रीकृष्ण सेवाभावी संस्था संचलित बालगृह बोटा येथील विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.



कोपरगावात स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

अवैध धंद्यांवर ५ ठिकाणी छापे; ११ आरोपींवर ५ गुन्हे, २.१४ लाखांचा मुद्देमाल जप्त

कोपरगाव (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमे अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने कोपरगाव शहर व तालुक्यात धडक कारवाई करत पाच ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत ११ आरोपींविरुद्ध पाच गुन्हे दाखल करण्यात आले असून, एकूण २ लाख १४ हजार ७७२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी विशेष पथक तयार करून अवैध व्यवसायांची माहिती घेत कारवाईचे नियोजन केले. पोलीस अंमलदार अरुण गांगुर्डे, विजय ठोंबरे, अभिजीत अरकल, अशोक लिपणे, रणजीत जाधव आणि अमृत आढाव यांच्या पथकाने १ ऑगस्ट रोजी कोपरगाव शहर व तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकाच वेळी पाच ठिकाणी छापे टाकले.

कारवाई दरम्यान गुटखा विक्री व जुगार अड्ड्यांवर धाड टाकून विविध गुन्हे दाखल करण्यात आले. गुटखा विक्री प्रकरणात अभिजीत ठाकरे, नदीम शेख, अल्ताफ मनियार, अरिफ पठाण यांच्यासह इतरांविरुद्ध गुन्हे दाखल झाले. तर महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गणेश गर्जे, विनोद आहिरे, प्रसाद पेंढारे, सोमनाथ महाजन, रविंद्र तेलोरे यांच्यावर कारवाई करण्यात आली. या प्रकरणातील दोन आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.

या संपूर्ण कारवाईत गुटखा, रोख रक्कम, जुगार साहित्य व इतर मिळून २,१४,७७२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली असून, जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधातील मोहीम पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.



थोडक्यात पण महत्त्वाचे

शेडगावच्या सरपंच संध्या शेंडे यांना 'सह्याद्रीरत्न गुणगौरव पुरस्कार २०२६



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील शेडगाव ग्रामपंचायतीच्या आदर्श सरपंच संध्या विजय शेंडे यांना नालंदा ऑर्गनायझेशनच्या वतीने प्रदान करण्यात येणाऱ्या 'सह्याद्रीरत्न गुणगौरव पुरस्कार २०२६' ने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार सोहळा १ ऑगस्ट २०२६ रोजी पुणे येथील नवी पेठमधील पत्रकार भवन येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

सरपंच संध्या शेंडे यांनी शेडगावमध्ये रस्ते, पाणीपुरवठा, वीज यांसारख्या मूलभूत सुविधांसह विविध विकासकामे प्रभावीपणे राबविली आहेत. ग्राम विकासासाठी केलेल्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत नालंदा ऑर्गनायझेशनने केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे त्यांची निवड या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी करण्यात आली.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर सामाजिक, राजकीय, शैक्षणिक तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी संध्या शेंडे यांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले. ग्रामविकासाच्या उर्वरित योजनांना अधिक गती देण्यासाठी हा सन्मान प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

११२ चा गैरवापर केल्याप्रकरणी कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन मध्ये एकावर गुन्हा दाखल

कोपरगाव (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील शिरसगाव येथे गुटखा विक्री सुरू असल्याची खोटी माहिती डायल ११२ वर देऊन पोलिसांची दिशाभूल केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सागर छगन भागवत (रा. सावळगाव, ता. कोपरगाव) याने ३१ जुलै रोजी डायल ११२ वर कॉल करून शिरसगाव येथील एका दुकानात गुटखा विक्री सुरू असल्याची माहिती दिली. या माहितीच्या आधारे पोलीस अंमलदार युवराज खुळे यांनी पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली घटनास्थळी भेट देत सागर भागवत याने दाखविलेल्या ठिकाणी स्थानिक २ पंचांच्या उपस्थितीत शिरसगाव बसस्थानका समोरील प्रियंका जनरल स्टोअर्स या दुकानाची झडती घेतली मात्र, तपासादरम्यान दुकानात कोणताही गुटखा किंवा अन्य प्रतिबंधित पदार्थ आढळून आला नाही.



त्यामुळे पोलिसांनी आपल्या भाषेतअधिकची चौकशी केलीं असता दुकानमालकाने उधारीवर वस्तू देण्यास नकार दिल्याच्या रागातून त्याला त्रास देण्याच्या उद्देशाने सागर भागवत याने पोलिसांना खोटी माहिती दिल्याचे निष्पन्न झाले.

याप्रकरणी पोलीस अंमलदार युवराज खुळे यांच्या फिर्यादीवरून सागर छगन भागवत याच्याविरुद्ध अदखलपात्र गुन्हा रजिस्टर नंबर ६३९/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २१७ नुसार कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार निजाम शेख हे करीत आहेत.

क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती जिल्हा परिषद ठाणे येथे साजरी



ठाणे (समर्थ गांवकरी)

स्वातंत्र्य चळवळीतील महान क्रांतिकारक क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त आज, दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हा परिषद ठाणेच्या सभागृहात अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर यांच्या हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही पुष्पांजली अर्पण करून स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या अतुलनीय योगदानाला आदरांजली वाहिली. त्यांच्या राष्ट्रप्रेम, लोकहितवादी विचारसरणी, सामाजिक बांधिलकी आणि स्वातंत्र्यलढ्यातील धाडसी कार्याचा यावेळी गौरव करण्यात आला. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत समाजहित आणि लोककल्याणासाठी समर्पित भावनेने कार्य करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी जिल्हा परिषदेतील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संगमनेर तालुक्यातील पतसंस्थांचे एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

सहकार क्षेत्रात पतसंस्थांच्या माध्यमातून मोठी क्रांती-माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

संगमनेर तालुक्यातील पतसंस्थांच्या २४०० कोटींच्या ठेवी असून संगमनेरच्या विकासासाठी मोठा हातभार लावला आहे. प्रशिक्षण घेणे ही काळाची गरज आहे.या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे पतसंस्थांच्या काम काजात निकोप वाढ होऊन पतसंस्थेच्या कामाचा गुणवत्ता पूर्वक दर्जा सुधारेल. नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशन, महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन व संगमनेर तालुका पतसंस्था फेडरेशन चा हा उपक्रम कौतुकास्पद असून पतसंस्थांच्या चळवळीला बळ देणारा आहे.संगमनेर तालुक्याच्या विकासाला पतसंस्थांचे फार मोठे योगदान लाभलेले आहे.सहकार क्षेत्रात पतसंस्थांच्या माध्यमातून मोठी क्रांती झाली आहे.असे प्रतिपादन माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

संगमनेर येथील भंडारी मंगल कार्यालय येथे नाशिक विभागीय नागरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था फेडरेशन,महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन संगमनेर तालुका पतसंस्था फेडरेशन व तालुका उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने संचालक मंडळ,सीईओ, जनरल मॅनेजर यांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते संपन्न झाले.याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत माजी आमदार डॉ.सुधीर तांबे, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे कार्यकारी अध्यक्ष काकासाहेब कोयटे,माजी सहकार आयुक्त व निबंधक

शैलेश कोतमीरे,अपर आयुक्त

श्रीकृष्ण वाडेकर,नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष

वसंत लोढा,कार्याध्यक्ष गोपाळ पाटील,व्यवस्थापक महेश जाधव,संगमनेर तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष बापूसाहेब टाक,संतोष कोटे,सायबर तज्ञ अथर्व भांबुरकर,माराठा सेवा पतसंस्थेचे उपाध्यक्ष उदय अनभुले,संग्राम पतसंस्थेचे चेअरमन राणीप्रसाद मुंदडा आदी उपस्थित होते.

काकासाहेब कोयटे म्हणाले, प्रशिक्षण हे पतसंस्थेच्या विकासाचा गाभा असून आज या ठिकाणी माजी सहकार आयुक्त शैलेश कोतमीरे व माजी अप्पर आयुक्त श्रीकृष्ण वाडेकर यांनी या प्रशिक्षण वर्गात पतसंस्थांना विशेष मार्गदर्शन केले आहे. अहिल्यानगर हा जिल्हा सहकाराचा बालेकिल्ला असून संगमनेर तालुका हि सहकाराची कामधेनू आहे.

वसंत लोढा म्हणाले,नगर जिल्ह्यातील पतसंस्था चळवळ ही महाराष्ट्राच्या पतसंस्था चळवळीला मार्गदर्शक व्हावी.या उद्देशाने नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनच्या माध्यमातून जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात अशा पद्धतीने प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून संगमनेर तालुक्यापासून प्रशिक्षण कार्यशाळेचा प्रारंभ करण्यात आला आहे. जिल्ह्यातील पतसंस्थांच्या बराच मोठ्या अडचणी आहेत.अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून पतसंस्थांना वेगवेगळ्या प्रकारे सहकार्य अपेक्षित आहे. जिल्हा बँकेच्या असलेल्या २५% ठेवी पतसंस्थांच्या आहेत. त्याबाबतीत माननीय बाळासाहेब थोरात यांनी लक्ष घालून जिल्हा बँकेच्या माध्यमातून पतसंस्थांना मदत व सहकार्य होईल असे करावे.

या एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेसाठी संगमनेर तालुक्यातील पतसंस्थांचे २००हुन अधिक प्रतिनिधी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राणीप्रसाद मुंदडा यांनी केले.तर आभार संगमनेर तालुका फेडरेशनचे अध्यक्ष बापूसाहेब टाक यांनी मानले.

खासदार निलेश लंके यांच्या प्रयत्नांतून श्रीगोंद्यात दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक नोंदणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)



अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार निलेश लंके यांच्या प्रयत्नांतून श्रीगोंदा शहरातील पंतनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक नोंदणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दिव्यांग सक्षमीकरण विभाग, अहमदनगरचे माननीय देविदास कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या शिबिरात २१२ दिव्यांग व वयोवृद्ध व्यक्तींची नोंदणी करण्यात आली.

या प्रसंगी ज्येष्ठ नेते बाबासाहेब भोस, अनिल ठवाळ, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी राणी फराटे, आरोग्य अधिकारी तसेच नगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. श्रीगोंदा तालुका प्रहार दिव्यांग संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र पोकळे, डॉ. सोमनाथ देवकाते, हरिभाऊ खामकर, शिराज शेख, मच्छिंद्र पाटोळे, छबुलाल सय्यद, बाबा घोडके, शशिकांत आंधळकर, बाळासाहेब पिपाडा, गणेश कळसकर, सचिन ढोले, संदीप नय्यर, अमोल भागवत, श्री. वडवकर, रिया शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राजेंद्र पोकळे यांनी प्रास्ताविक केले. शासनाच्या विविध योजनांचा लाभ दिव्यांग व गरजू व्यक्तींना पारदर्शक आणि काटेकोरपणे मिळावा, यासाठी संबंधित विभागांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले. उपस्थितांनी खासदार निलेश लंके यांच्या प्रयत्नांचे कौतुक करत त्यांचे आभार मानले.

दिव्यांग योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी दिल्लीत बैठक; श्रीगोंद्यात लवकरच जनता दरबार : खासदार निलेश लंके

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)



केंद्र सरकारच्या दिव्यांग योजनांची सविस्तर माहिती समजून घेण्यासाठी आणि त्या योजनांचा लाभ तळागाळातील दिव्यांग बांधवांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी खासदार निलेश लंके यांनी स्थानिक अधिकारी व कार्यकर्त्यांना थेट दिल्लीत येण्याचे आमंत्रण दिले आहे. भाषेची अडचण जाणवत असल्याने केंद्रीय अधिकाऱ्यांसोबत प्रत्यक्ष बैठक घेऊन योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारक करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

श्रीगोंद्यात लवकरच भव्य जनता दरबार

श्रीगोंदा तालुक्यातील नागरिकांच्या समस्या तत्काळ आणि जागेवरच सोडविण्यासाठी लवकरच भव्य जनता दरबार आयोजित करण्यात येणार असल्याची माहितीही खासदार लंके यांनी दिली. या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन तसेच तक्रारींचे तातडीने निराकरण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

तक्रारींची तत्काळ दखल

संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना तसेच दिव्यांग बांधवांच्या मानधनाबाबत काही तक्रारी प्राप्त होताच खासदार लंके यांनी तत्काळ तहसीलदार सचिन डोंगरे यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून लाभार्थ्यांच्या अडचणी दूर करण्याच्या सूचना दिल्या.

३५० दिव्यांग बांधवांची नोंदणी

पंतनगर, श्रीगोंदा येथील कम्युनिटी हॉलमध्ये दिव्यांग बांधवांशी संवाद साधताना खासदार लंके म्हणाले की, या उपक्रमात सुमारे ३०० ते ३५० दिव्यांग बांधवांची नोंदणी करण्यात आली आहे. त्यांच्या गरजेनुसार आवश्यक साहित्याचे वितरण लवकरच करण्यात येईल,या प्रसंगी जिल्हा समाजकल्याण अधिकारी देविदास कोकाटे, गटविकास अधिकारी राणी फराटे, विस्तार अधिकारी यादव, बाबासाहेब भोस, संजय लाकूडझोडे, हरिदास शिर्के, प्रशांत दरेकर, अनिल ठवाळ, निवास नाईक, टिळक भोस, राजेंद्र पोकळे, भगवानराव गोरखे, दूतारे नाना, लहू मोटे, बाळासाहेब उगले, माऊली हिरवे, नलवडे मेजर, सचिन पठारे, अशीरभाई शेख, भोर सर, अरविंद कापसे, शिर्के सर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिराच्या पहिल्याच दिवशी मोठ्या संख्येने दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांनी नोंदणी करून मूल्यांकन करून घेतले. लाभार्थ्यांनी शासनाच्या या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत अशा शिबिरांमुळे महागडी सहाय्य साधने मोफत मिळण्याची संधी उपलब्ध होत असल्याचे सांगितले.

अण्णाभाऊ साठेंच्या विचारांनी महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीला नवी दिशा दिली : आमदार आशुतोष काळे



कोपरगांव (समर्थ गांवकरी)

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य, शाहिरी आणि सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीला नवी दिशा दिली. त्यांनी उपेक्षित, कष्टकरी आणि वंचित घटकांच्या व्यथा प्रभावीपणे मांडून समानता, न्याय आणि स्वाभिमानाचा संदेश दिला. स्वातंत्र्य चळवळ व संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात त्यांचे योगदान सदैव प्रेरणादायी राहील असे प्रतिपादन आमदार आशुतोष काळे यांनी केले.

समाजातील शोषित, वंचित आणि सर्वसामान्यांच्या जीवन संघर्षाला आपल्या लेखणी व शाहिरीतून आवाज देणारे थोर साहित्यिक, लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आमदार आशुतोष काळे यांनी कोपरगाव येथील त्यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.याप्रसंगी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांचे विचार आजही समाजाला एकतेचा, संघर्षाचा आणि परिवर्तनाचा मार्ग दाखवतात. त्यांच्या विचारांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सामाजिक समता,न्याय आणि सर्वसमावेशक विकासासाठी कार्यरत राहणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच कोपरगाव शहरात विविध ठिकाणी जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक कार्यक्रमांना आमदार आशुतोष काळे यांनी भेट देवून सर्वांना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी नितीन साबळे, अर्जुन मरसाळे, राजेंद्र खैरनार, दिलीप तुपसुंदर, संतोष मरसाळे, सुनिल वैरागळ, राजेंद्र वैरागळ, संजय साळवे, भागवत साहेब, रवी धिवर,भारत सदर, राजेंद्र कांबळे, समाधान शिंदे, बुधा भालेराव, सचिन आहिरे, अनिल आवारे, सचिन पाटोळे, पवन निर्मळ, शुभम आहिरे, अरुण मरसाळे, अजय जगधने, नितीन ताकवणे, विजय मरसाळे, राहुल सौदागर, दिपक मरसाळे, आकाश मरसाळे, अमोल सौदागर, दिनेश गायकवाड, मयूर रीळ, ज्ञानेश्वर घोडेस्वार, सनी रिळ, रंगनाथ मरसाळे, रवींद्र मरसाळे, नामदेव पगारे, मंगेश मरसाळे, रणवीर आहिरे, किशोर आहिरे, फकीरा चंदनशिव, संदिप निरभवणे आदी समाजबांधवांसह सुनिल गंगुले, नगरसेवक मंदार पहाडे, राजेंद्र वाकचौरे, शैलेश साबळे, विजय त्रिभुवन, संदिप कपिले, राहुल शिरसाठ, इम्तियाज अत्तार, सोमनाथ आढाव, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक दिनार कुदळे, माजी नगरसेवक कृष्णा आढाव, बाळासाहेब आढाव, शिवाजी खांडेकर, रमेश गवळी, फकीर कुरेशी, दिनकर खरे, अरुण त्रिभुवन, सचिन परदेशी, जावेद शेख, राहुल सोनवणे, राजेंद्र जोशी, मुकुंद भूतडा, प्रशांत वाबळे, सागर आहेर, संदिप सावतडकर, विशाल निकम, अनिल जाधव, प्रसाद रुईकर, प्रदीप कुऱ्हाडे, योगेश वाणी, गणेश गोसावी, नितीन शेलार, मयूर राऊत, भाऊसाहेब भाबड, संजय दुशिंग, राजेंद्र उशिरे, दिनेश गाडेकर, ओम आढाव, हर्षल जैस्वाल, हारुण शेख, अजय शेळके उपस्थित होते.

टाकळी ढोकेश्वर येथे खड्ड्यात झाड लावून गांधीगिरी

गावांतर्गत मुख्य रस्ते बनले धोकादायक

ग्रामस्थांची आक्रम क भूमिका

टाकळी ढोकेश्वर बाजारपेठेचे अस्तित्व धोक्यात असल्याची चिंता

पारनेर (समर्थ गांवकरी)

टाकळी ढोकेश्वर हे परिसरातील गावांसाठी महत्त्वाचे बाजारपेठेचे केंद्र असून गावात येणाऱ्या प्रमुख रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग (झथऊ) तसेच ग्रामपंचायत प्रशासनाकडून या गंभीर समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी पाण्यात उतरून अनोखे आंदोलन केले. खड्ड्यात उभे राहून झाड लावत गांधीगिरी केली.

या आंदोलनादरम्यान शिवसेनेचे युवा नेते लहू जाधव,उपसरपंच रामभाऊ तराळ, युवा नेते विक्रम झावरे, शिवसेना नेते अंकुश पायमोडे, माळीभाऊ रांधवण, किसन धुमाळ, युसुफ हवालदार, सुभाष महाराज जाधव, भाऊसाहेब झावरे, शिराज हवालदार, नामदेव ठुबे, सनी घाडगे, अभिजित (बंटी) जाधव, निहाल हवालदार के. बी. बांडे यांच्यासह अनेक ग्रामस्थ सहभागी झाले होते.

रस्त्यावरील खड्ड्यांचा निषेध नोंदवण्यासाठी आंदोलनकर्त्यांनी खड्ड्यामध्ये वृक्षारोपण केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते विक्रम झावरे पाटील यांनी संबंधित ठेकेदाराच्या कामाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली. कारवाई न झाल्यास ग्रामपंचायत व झथऊ विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, गावातील अनेक महत्त्वाच्या रस्त्यांवर अतिक्रमण झाल्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या वाढली आहे. खड्डे आणि अतिक्रमण यामुळे एस.टी. बससेवाही गावाबाहेरून वळवली जात असल्याने स्थानिक बाजारपेठेवर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने खड्डे बुजवून अतिक्रमण हटवावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

ठेकेदाराच्या कामाची सखोल चौकशी करा

टाकळी ढोकेश्वरच्या प्रमुख रस्त्यांवरील खड्डे हे प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे प्रतीक आहेत. या रस्त्यांमुळे रोज अपघात होत असून नागरिकांचे जीव धोक्यात आले आहेत. संबंधित ठेकेदाराच्या कामाची सखोल चौकशी करून दोषींवर तातडीने कारवाई करावी. अन्यथा ग्रामपंचायत व झथऊ विरोधात ग्रामस्थांच्या सहभागाने तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल,

–विक्रम झावरे (टाकळी ढोकेश्वर)



टाकळी ढोकेश्वर बाजारपेठेचे अस्तित्व धोक्यात

टाकळी ढोकेश्वरच्या गावातील प्रमुख रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. टाकळी ढोकेश्वर ही परिसरातील मोठे बाजारपेठ असून या बाजारपेठेचे अस्तित्व त्यामुळे धोक्यात आले आहे. त्यामुळे दररोज लहान–मोठे अपघात होत असून नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. प्रशासनाने वारंवार मागणी करूनही दखल घेतलेली नाही.

–लहू जाधव (शिवसेना नेते, टाकळी ढोकेश्वर)